# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

(दुरध्वान:०२३१-२५२१०३८) विद्यानगर कोल्हापूर (फॅक्स: ०२३१-२५२१०१६

ई-मेल: gpkolhapur@yahoo.com **परीक्षा विभाग** संकेत स्थळ www.gpkolhapur.org.in


जा.क्र.शातंनिको/पवि/२०२०/ 244 दि. ०२/०१/२०२०

# विद्यार्थ्यांना सुचना

**विषय :- नियमीत विद्यार्थ्यासाठी विषय नोंदणी व परीक्षा अर्ज भरणेबाबत(R,R+RR)**

सर्व नियमित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, सम सत्र २०१९-२० च्या विषयांची नोदंणी व परीक्षा अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Date | Programme (Both Shifts) |
|---|---|
| 03/01/2020 To 09/01/2020 | All Programme |

**नियमीत** (R) परीक्षा विद्यार्थ्यासाठी ६०० रूपये (सत्र परिक्षा -५०० चाचणी परिक्षा -१०० )

**नियमीत** (R+3RR) विद्यार्थ्यासाठी ९०० रूपये ( सत्र परिक्षा -८०० चाचणी परिक्षा -१००.

**नियमीत** (R+more than 3RR) विद्यार्थ्यासाठी ११०० रूपये (सत्र परिक्षा -१००० चाचणी परिक्षा -१००.

१) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या सांकेतीक स्थळावर (www.gpkolhapur.org.in) त्यांचे माहिती पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो,ई-मेल अॅड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपुर्वक वाचून गरज असल्यास दुरूस्त करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्यांने स्वत:चाच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करु शकतील. विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिती पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी व्दारे सुचना देणेत येतील.

२) आपला पासवर्ड विद्यार्थ्यानी गोपनिय ठेवावा तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी. पासवर्ड विसरलेस रु.५०/- इतके शुल्क भरुन पासवर्ड घेता येईल.

३) सर्व विद्यार्थ्यांनी सम सत्र २०१९-२० विषय नोंदणी/पुन:र्नोंदणी संबंधी आपल्या विभागातील नोंदणी अधिकारी / वर्गशिक्षक यांच्याशी संपर्क साधुन योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा. Detain झालेल्या विषयांची नोंदणी पुन्हा R म्हणून करुन विद्यार्थ्यांने त्याचे सत्र कर्म पुर्ण करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

४) एकदा विषय नोंदणी /परीक्षा अर्ज विद्यार्थ्याने ऑनलाईन Save केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत विषय नोंदणी अधिकारी / वर्ग-शिक्षक यांचे कडुन बदल करुन घ्यावा व तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करुन सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

५) गुण पडताळणी/फोटोकॉपी साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधीत निकालाच्या अधिन राहुन विभागातील विषय नोंदणी अधिकारी/वर्ग-शिक्षक/विभाग प्रमुख यांचेकडे तदानुषांगिक आशयाचा (विषय नोंदणी/पुन:र्नोदणी बदल,विषयाच्या थेअरी/प्रॅक्टिकलचे क्लास अटेंड करणे ई.) अर्ज करुन पुर्व परवानगी घेऊन ठेवावी. जेणेकरुन संभाव्य शैक्षणिक व आर्थिक नुकसान (लेट फी) टाळता येईल.

६) गुण पडताळणी/ फोटोकॉपीचा निकाल जाहीर झालेनंतर त्यानुसार परीक्षा विभागात अर्ज करुन मुळ गुण पत्रिका जमा करावी व सुधारीत गुण पत्रिका, विषय नोंदणी/विषय पुनःर्नोंदणीमध्ये आवश्यक तो बदल परीक्षा विभागामार्फत करुन घ्यावा. तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करुन सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

७) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरलेनंतर विषयनोंदणी/परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पध्दतीने आकारणेसाठी विद्यार्थी विभागाशी आवश्यकता असल्यास संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. फी पावतीची छापील प्रत घ्यावी. या पावतीची दुय्यम प्रत व विषयनोंदणी अर्ज विभागातील विषय नोंदणी अधिकारी यांच्याकडे कायम करणेसाठी (**confirm** ) जमा करावे. विषय नोंदणी अधिकारी दि.०३/०१/२०२० ते १३/०१/२०२० या कालावधीत अर्ज कायम (**confirm**) करतील.

८ )ज्या विद्यार्थ्यांनी मागील सत्राच्या सुरवातिस वार्षिक फी ( **Tutionfees**) भरलेली असेल त्यांनी पुन्हा सदर फी भरणेची गरज नाही. त्यांनी या सत्राची केवळ परिक्षा व चाचणी शुल्क ( व लागु असल्यास टूल फी इ.) भरणेचे आहे.

विषय नोंदणी अधिकाऱ्यांनी अर्ज कायम केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापुर

प्रतः-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..
२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
३.सर्व विभागाना जाहीर करणेसाठी